# धनाजी बळी गेला !

## सोनबाची वाट काय ?

**सोनबा म्हणतो. "सरकार दरबारी जरी आम्हाला न्याय मिळाला तरी कोणत्यावेळी आमच्यापैकी कुणा भावाचे काय होईल ते सांगता येत नाही...**

**तक्रार केली तर नेहमीच खाकीचा "हिसका" आम्हालाच बसतो."**

काँग्रेस पक्षाच्या लोकशाहीतील आणि जनतापक्षाने मिळवून दिलेल्या तथाकथीत दुसऱ्या स्वातंत्र्य पर्वातील ही प्रत्यक्ष घडलेली, घडत असलेली कहानी आहे.

औरंगाबाद मधील एका गावातील एक शेतमजूर कुटुंब, कुटुंबात पती धनाजी, पत्नी, ५ मुले आणि मुली. मजुरी करून आपला प्रपंच ते चालवित होते.

त्याच गावात फुलाजी नावाचा निरनिराळ्या नावाखाली पण एकाच कुटुंबात ७५ एकराचे वर स्वतःची शेती (बरीच ओलीताखाली) करून घेणारा व मक्त्याने दुसऱ्याच्या जमिनी कसून घेणारा, सावकारी करणारा बड्या मंडळींच्या आश्रयाखाली असलेला एक शेतकरी. तो धनाजीची १४ एकर जमिन मक्त्याने कराचा. त्याने एकदा शेती घेतली ती पुन्हा परत केलीच नाही!

घरची जमिन गेली, लहान लहान मुले, हातावर एवढे कुटुंब चालविणे कठीण झाले. धनाजीच्या पत्नीने धीर सोडला आणि ती इहलोकी निघून गेली, वर्षादीड वर्षात धनाजीनेही इहलोकाची यात्रा संपविली. घरातला सर्वात मोठा मुलगा सोनबा २० वर्षाचा. बाकी सर्व लहान लहान उघड्यावर पडली. मोठ्या हिमतीने गावकऱ्यांच्या मदतीने, सहानुभुतीने कोर्टकचेऱ्या केल्या. व जमिनीचा ताबा देण्याचा हुकूम कोर्टाने केला. परंतु अल्पावधीतच सोनबाकडील जमीन गेली. मुले उघड्यावर पडली, अक्षरशः गावात भीक मागायला लागली.

औरंगाबाद जिल्हा शेतमजूर युनियनचे या भागात काम आहे, गावातीलच नव्हे तर गावा भोवतालच्या गावांची धनाजीच्या मुलांना सहानुभूती. काही तरी करायला पाहिजे, न्याय मिळाला पाहिजे असा सुर. शेतमजूर युनियनचे कार्यकर्त्यांनी गावात जाऊन अगोदरच या विभागात संघटीत असलेल्या आदीवासीना बरोबर घेऊन गावोगावी सभा घेतल्या, बैठकी घेतल्या. २०० शेतमजूर, गरीब शेतकऱ्यांनी, आदिवासी स्त्री-पुरुषांसह शेतमजूरांच्या किमान वेतन कायद्याची अंमल बजावणी व्हावी, शेतमजूर आदिवासी इत्यादिनी दिलेल्या तक्रारीची फौजदार दखल घेत नाहीत म्हणून त्यांची त्वरित बदली करण्यात यावी, रोजगार हमी योजनेखाली शेतमजूरांना कामे उपलब्ध करून देण्यात यावी, सोनबाची जमीन परत देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन शासनाचे प्रतिनिधी म्हणून फौजदारास देण्यात आले.

निवेदन स्विकारून ताबडतोब फौजदार साहेबांनी शिष्टमंडळात गेलेल्या ७ प्रमुख कार्यकर्त्यावर विनापरवानगी मोर्चा काढला म्हणून मुंबई पोलीस कायद्याच्या एकाच कलमाखाली वेगळ्या वेगळ्या केसेस केल्या. मोर्चा निघणार, आपल्याच विरोधात काहीतरी चाललेले आहे, असा फुलाजीचा समज होऊन त्यांनी सोनबा व त्यांना धीर देणाऱ्यांना जिवे मारण्याचा कट तयार केला तो अगदी जमिनीत गाडून टाकण्यासाठी खड्डे तयार करण्यापर्यंत. परंतु सोनबा व त्याचा भाऊ सांगतो आम्ही आमचे लहान भाऊ व बहिणीना दुसऱ्याकडे झोपी घालून रात्री घरातून पळून आलो व तीन दिवस डोंगरावर दडून राहिलो, नंतर औरंगाबादला जाऊन खबर दिली. त्यातच सोनबापासून माझ्या जिवितास धोका असल्याबाबतची खोटी तक्रार फुलाजीने गुदरल्याने सोनबा व दादारावच्या मागे पोलीसाचा ससेमिरा सुरू झाला. ही बाब त्याने डी. एस. पी. ना कळवली. फौजदाराने पुन्हा काही एक चौकशी न करता वरिष्ठाकडे अर्ज दाखल केला म्हणून न्यायालयात सोनबाच्या विरोधात गुन्हा नोंदविला. अद्याप त्याच्यावरील व संघटनेच्या कार्यकर्त्यांवरील केसेस न्याय प्रविष्ट आहेत.

(पान ३३ पहा.)